<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>
(दुपार)

जा.क्र.६२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०९/२०१७

**१) अज्ञात वाहन चालकांच्या धडकेत एक गंभिर जखमी . :–**

दिनांक २/०९/२०१७ चे २०.०० ते २०.१५ वा. दर. यातील जखमी प्रशांत हरीभाऊ कठाने वय २६ वर्ष, रा. दिघोरी मोठी हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे १६७९ ने लाखनी कडुन पोहरा मार्गे दिघोरी मोठी येथे जात असतांनी कनेरी दगडी गावाजवळ यातील अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकला धडक मारुन मोटार सायकल चालकास गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी हरीभाऊ पांडुरंग कठाने वय ६६ वर्ष, रा. दिघोरी मोठी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. पुसाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन शेतीच्या वादावरुन अश्लिल शिवीगाळ करुन बंदुकीने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/०९/२०१७ चे १८.०० वा. दर. पर्यंत यातील आरोपीतांनी शेतीच्या वादावरुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस तुझ्या बापाची जागा आहे का तुझ्या मायेची व बापाची हत्या करतो, तसेच अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन बंदुकीने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सुनील शंकर चौधरी रा. शिंगोरी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १४३,२९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**३) मोटार पंपाची चोरी :–**

दिनांक ०२/०९/२०१७ चे चे रात्र दर. यातील फिर्यादी संदेश ज्ञानेश्वर वासनीक वय २९ वर्ष, रा. फुलमोगरा यांचे विहीरीवर लावलेली ०.५ एचपी ओपन वेल मोटार पंप व ०.१ एचपी सीआरआय कंपनीची वेल मोटार पंप अश्या एकुण ८,०००/–रु. चा मोटार पंप कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) वाहन सार्वजनीक ठिकाणी थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०३/०९/२०१७ चे १६.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहण महेन्द्रा मॅक्स गाडी क्र. एमएच २९ एनओ ९१०३ ही आमरोडवर येणाऱ्या वाहतुकीस व लोकाच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. अंबादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) तलावाचे पाण्यात बुडुन मुलांचा मृत्यु. :–

दिनांक ०३/०९/२०१७ चे १४.३० ते १७.३० वा. दर यातील यातील फिर्यादीची मृतक क. १) कु. सारीका छबीलाल सरीयान वय १० वर्ष, रा. सुदरटोला ही मुलगी असुन व मृतक क.२ ही पुतनी लागत असुन २) कु. मुस्कान धनलाल सरीयान वय १२ वर्ष, व क ३) प्रणव धनलाल सरीयान वय ०६ वर्ष, .हा पुतण्या लागत असुन हे घरापासुन ५०० मीटर अंतरावर असलेल्या गावाठान तलावावर आंघोळ करायला गेले असता, तलावाचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी छबीलाल माणीक सरीयान वय ३६ वर्ष, रा. सुदरटोला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. झोंटीग पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०३/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९० केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.